**<u>प्रेसनोट</u>** **दिनांक २८/१०/२०२३**

**अंमली पदार्थ विक्री करणारे दोन इसमांना एक किलो चरस सह अटक केलेबाबत**

दिनांक २५/१०/२०२३ रोजी रात्रौ ०१.०० वाजताचे दरम्यान सारस्वत बॅकेसमोर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, खार पश्चिम, मुंबई येथे दोन इसम हे संशयितरीत्या मिळून आला. त्यांची झडती घेतली असता त्यांचेकडे ०१ किलो ०७ ग्रॅम इतके वजनाचा, अंदाजे रु. ३०,२१,०००/- इतके किमंतीचा चरस हा अमंली पदार्थ मिळुन आला. म्हणून त्याचे विरूध्द खार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र. ८६५/२०२३ कलम ८ (क) सह २०(ब) सह २९ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ अन्वये गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे.

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग श्री. परमजितसिंग दहिया, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ श्री. कृष्णकांत उपाध्याय, सहाय्यक पोलीस आयुक्त, बांद्रा विभाग, मुंबई श्री. भुषण बेलणेकर यांचे मार्गदर्शनाखाली खार पोलीस ठाणे, मुंबई येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. मोहन माने, दहशतवाद विरोधी पथकाचे अधिकारी पोउनि श्री. विश्वनाथ आंबोळे, पो.ह. श्री. सागर कांबळे, पो.ह.श्री. इम्रान शेख, पो.शि.श्री. शिंदे व पो.शि.श्री. राणे यांनी सदरची कामगिरी पार पाडली आहे.

-------००--------